# दिव्यांगांना अंध काठीचे वाटप



**देगलूर /प्रतिनिधी**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालय देगलूर व देगलूर महाविद्यालय माजी विद्यार्थी संघांच्यावतीने माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देगलूर महाविद्यालय माजी विद्यार्थी संघांचे उपाध्यक्ष ॲड.मोहसीन अली व सचिव डॉ . सुरेंद्र आलुरकर होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, प्रा. संग्राम पाटील, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, नॅक समन्वयक डॉ. लक्ष्मणं सुदाम उपस्थित होते.

या कार्यक्रमात बी.ए. प्रथम व द्वितीय वर्ष या वर्गातील आठ दिव्यांग विद्यार्थ्यांना अंध काठीचे वाटप करण्यात आले. देगलूर महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी विविध पातळीवर गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करावी म्हणून राष्ट्रीयकृत बँकेत खाते सुरु करण्यात आले असून त्याद्वारे विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी आपल्या प्रास्ताविकातून दिली. फराना खान, श्रीकांत पंचगुडे, सविता शिंदे, बळीराम गायचुरे, हनमंत गोरगे, माधव सूर्यवंशी, मलीकार्जून हत्ते, भगवान भोईवारया दिव्यांग विद्यार्थ्यांना अंध काठी भेट देण्यात आली. अलीकडच्या काळात समाजातील दानशूर नागरिकांनी दिव्यांग बांधवाना केवळ मदत करू नये तर कर्तव्य भावनेतून मदत करावी असे प्रतिपादन डॉ. सुरेंद्र आलुरकर यांनी केले.तर ॲड.मोहसीन अली यांनी देगलूर महाविद्यालयीन जीवनातील विविध अनुभव कथनातून महाविद्यालयाची वैभवशाली परंपरा कथन केली. डॉ. बी.आर.कतुरवार यांनी सुत्रसंचालन केले.तर प्रा. संग्राम पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. नीरज उपलंचवार ,कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह एन.सी.सी.च्या विद्यार्थांनी परिश्रम घेतले.